# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 31.07.2025** **वार- गुरुवार**

---

**<u>चंद्रकांतपुलकुंडवार</u>**

नागरिकांना सेवा पुरवताना त्या सहजतेने, सुलभरित्या मिळाव्यात यासाठी मुख्यमंत्र्यांचा १५० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रम यशस्वीरित्या राबवावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले. सर्व अद्ययावत कायदे, नियम, शासन निर्णय आदींची माहिती आपल्या संकेतस्थळावर अपलोड करावी असंही ते म्हणाले. १५० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणी संदर्भात विधानभवनात आयोजित बैठकीत ते आज बोलत होते. यावेळी विभागातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

**<u>ॲडवोकेटवर्षादेशपांडे</u>**

समाजामध्ये स्त्री, पुरुष समानता निर्माण करण्यासाठी महिलांना पुरुषांप्रमाणेच आर्थिक स्वातंत्र्य मिळायला हवं असं मत लेक लाडकी अभियान आणि दलित महिला विकास संस्थेच्या ॲडवोकेट वर्षा देशपांडे यांनी पुण्यात व्यक्त केलं. वर्षा देशपांडे यांना नुकतंच संयुक्त राष्ट्र संघातर्फे ‘युएन पॉप्युलेशन पुरस्काराने गौरवण्यात आलं; त्यानिमित्त पुणे श्रमिक पत्रकार संघानं ॲडवोकेट देशपांडे यांच्याशी आज वार्तालाप आयोजित केला होता; त्यावेळी त्या बोलत होत्या. वैद्यकीय क्षेत्रातील तंत्रज्ञानाचा गैरवापर करून आजही गर्भलिंग निदान केलं जातं याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

**<u>पुरस्कार</u>**

शैक्षणिक संस्था सद्विचारांचे विद्यापीठ व्हाव्यात, असे विचार फुलगावच्या श्रुतिसागर आश्रमाचे संस्थापक स्वरूपानंद सरस्वती स्वामी यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र कीर्ति सौरभ प्रतिष्ठानच्या वतीने स्वरूपानंद सरस्वती स्वामी यांच्या हस्ते एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक  प्रा. डॉ. विश्वनाथ  कराड यांना ‘शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे

पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं; त्यावेळी ते बोलत होते. इतिहास अभ्यासक डॉ. केदार फाळके यांना यावेळी श्रीमंत मोरेश्वर बळवंत पुरंदरे शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

**pcmc**

पिंपरी चिंचवडला स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५मध्ये देशात सातवा आणि राज्यात पहिला क्रमांक मिळाला आहे. आता स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ स्पर्धेची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. या अनुषंगाने शहरातील नागरिकांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देत स्वच्छता मोहिमेचा शुभंकर तयार करण्यासाठी महापालिकेनं स्पर्धेचं आयोजन केलं आहे. यासाठी एक व्यक्ती एकच डिझाईन पाठवू शकते, यामध्ये स्वच्छता, आरोग्य, जबाबदारी, नागरिक सहभाग, आदी विषयांचा समावेश असावा, असं महापालिकेनं कळवलं आहे.

**अण्णाभाऊसाठे**

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त उद्या शहरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. विश्रांतवाडी इथल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात व्याख्यान, विद्यार्थ्यांचे पोवाडे, पथनाट्य सादर करण्यात येणार आहेत. या निमित्तानं विविध सामाजिक संस्था, स्थानिक मंडळे आणि राजकीय पक्षांच्या वतीने मिरवणुकाही काढण्यात येणार आहेत, त्यामुळे शहरातील काही रस्ते तात्पुरते बंद राहणार आहेत.

सकाळी सात वाजल्यापासून आवश्यकतेनुसार पुण्यातील वाहतुकीमध्ये बदल करण्यात येतील असं वाहतूक पोलिसांनी कळवलं आहे.

**खरीपहंगाम**

पुणे जिल्ह्यात गेल्या पाच वर्षात खरीप हंगामात सोयाबीन आणि मका पिकांच्या लागवड क्षेत्रात वाढ झाली आहे. जिल्ह्यामध्ये गेल्या पाच वर्षांत भात पिकाखालील लागवड क्षेत्रात बदल झाला नाही; तर बाजरीच्या पेरणीच्या क्षेत्रात दरवर्षी पावसाच्या प्रमाणात चढ-उतार होताना दिसत आहे. २०२०-२१ आणि २०२१-२२ या दोन वर्षांसाठी जिल्ह्यात सोयाबीनचं सरासरी क्षेत्र १७ हजार ४८२ हेक्टर होतं. २०२४-२५मध्ये ते ५० हजार ८०६ हेक्टरपर्यंत वाढलं. २०२०-२१मध्ये मका पिकाची लागवड २२ हजार ९५० हेक्टरवर झाली होती; २०२४-२५मध्ये हेच क्षेत्र ३६ हजार ८३६ हेक्टरवर पोहोचलं आहे; असं जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी सांगितलं.

**प्रदूषण**

पुण्यातील हवेच्या प्रदूषणात वाढ झाल्याचं पुणे महापालिकेने तयार केलेल्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालामधून स्पष्ट होत आहे. पुण्यात २०२३-२४ या वर्षाच्या तुलनेत उत्तम हवेचे दिवस २७ने कमी झाले आहेत. तर निकृष्ट दर्जाच्या हवेच्या दिवसांमध्ये वाढ झाली आहे. पुण्याच्या रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची संख्या आता ४१ लाख २५

हजार ९६८ झाली आहे. गेल्या वर्षभराच्या तुलनेत वाहनाच्या संख्येत तीन लाखांनी वाढ झाल्यानं वायूप्रदुषण वाढल्याचं दिसून येत आहे.

**<u>राखीपौर्णिमा</u>**

राखी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर सीमेवर संरक्षणासाठी तैनात असणाऱ्या जवानांसाठी सैनिक मित्र परिवाराच्या वतीने नुकत्याच राख्या पाठवण्यात आल्या. एक लाखाहून अधिक राख्यांचं पूजन करून त्या जवानांना पाठवण्यात आल्या.

**<u>गणेशोत्सव</u>**

पुण्यात गणेश मंडळांचे कार्यकर्ते आता गणेशोत्सवाच्या तयारीमध्ये गुंतले आहेत. गणपती विसर्जन मिरवणुकीत लक्ष्मी रस्त्यावरून सहभागी होणारे अखिल मंडई मंडळ आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट हे गणेशभक्तांचं मुख्य आकर्षण असतं; मात्र, यंदा खग्रास चंद्रग्रहण असल्याने विसर्जन मिरवणूकीत मानाचे पाच गणपती मार्गस्थ झाल्यानंतर त्या पाठोपाठ मिरवणुकीत सहभागी होण्याचा निर्णय या दोन्ही मंडळांनी घेतला आहे. यासंदर्भात आज पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या. उद्याही हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**